# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - ९३९/२०२२/अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पो.कॉ/५७४ श्री. संभाजी भारत गर्जे,<br>रा.मु.पो.नेम श्रीगोंदा पोलीस स्टेशन, श्रीगोंदा,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>कार्यालय अधीक्षक (पत्रव्यवहार शाखा),<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर,<br>ता.जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>पोलीस उप अधीक्षक (गृह),<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर,<br>ता.जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – ०६/०५/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक २३/०९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०६/०५/२०२२ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी उपस्थित होते. तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

तथापि, तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे प्रतिनिधी यांना प्राधिकृत न करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे. त्यामुळे तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी यांची उपस्थिती ग्राहय धरता येणार नाही.

सुनावणीदरम्यान तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल."

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील संबंधित तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २३/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती पुरविली. व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी चुकीचा निकाल दिला. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २३/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये आपल्या कसुरी अहवालाने मा.पो.महा.सं.म.रा.मुंबई यांच्या कडील पत्र क्र.पो.म.स./१अ-६/२२ कसुरी राठोड/५३/२०२०, दि.१३/०७/२०२१ अन्वये आमचे चौकशी चालु झाल्याने ती आता गोपनीय राहिलेली नाही सदर माहिती हि मी माझी वैयक्तीक मागणी करीत आहे. वरील नमूद केलेल्या संदर्भ अन्वये प्राथमिक चौकशी ही आपण केलेली आहे सदर चौकशीचे कागदपत्रे यांच्या छायांकित प्रतीची माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्याप्रमाणे प्राथमिक चौकशी अहवाल हा पोलीस मॅन्युअल भाग १,१९९१ मधील नियम क्र.४५६ (४) व विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील नियम ६,१४, (७) (ब) नुसार प्राथमिक चौकशी अहवाल हा गोपनिय असल्याने अर्जदार यांना देता येत नाही, असे कळविले. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०२/११/२०२१ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२/११/२०२१ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दिनांक २५/११/२०२१ रोजी निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवून प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २३/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ०७/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्याप्रमाणे प्राथमिक चौकशी अहवाल हा पोलीस मॅन्युअल भाग १,१९९१ मधील नियम क्र.४५६ (४) व विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील नियम ६,१४, (७) (ब) नुसार प्राथमिक चौकशी अहवाल हा गोपनिय असल्याने अर्जदार यांना देता येत नाही, असे कळविल्याचे स्पष्ट होते. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की,

या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

२) वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ९३९/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.९३९/२०२२/अहमदनगर/ ओ-१५८५ दिनांक-१०/०८/2022